# विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,

**१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com ,वेब साईट- www.dydepune .com

**<u>सुधारित वेळापत्रक</u>** जा.क्र.शिउसं/उमाशि-४०२/संच मान्यता २०१८-१९/२०१८
**दिनांक -१५.१०.२०१८**

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/
वरिष्ठ महाविद्यालय सलग्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे विभाग पुणे

**विषय :-सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यता ऑफलाईन पध्दतीने करणेबाबत**

**संदर्भ :१)दि.०६.१०.२०१८ रोजी मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे येथे झालेल्या सहविचार सभेमध्ये दिलेली सुचना**
**२)**विभागीय पुणे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना यांचेशी दि.१२.१०.२०१८ रोजी सहविचार सभेतील सूचनेनुसार

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यता ऑफलाईन पध्दतीने करण्याबाबत दि.०६.१०.२०१८ च्या बैठकीमध्ये सुचित करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने संच मान्यतेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे. आपल्या जिल्हयातील तालुक्यांच्या दिनांका दिवशी आपण सकाळी १०.३० ते ६.०० यावेळेत उपस्थित राहुन आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची संच मान्यता करुन घ्यावी.

१. संच मान्यतेसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संबधित जिल्हयाच्या सहा.शिक्षण उपनिरिक्षक यांच्याकडुन शासन निर्णयामध्ये दिलेल्या विहित नमुन्यातील अद्ययावत केलेले **<u>जनरल रजिस्टर</u>** प्रमाणे तपासुन घ्यावीत. व त्याचे प्रमाणपत्र संबधित सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक यांच्या स्वाक्षरीने प्रस्तावा सोबत सादर करावेत.
२. सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक यांनी शाखानिहाय /तुकडीनिहाय तपासलेली विद्यार्थी संख्या आणि सरल प्रणालीमध्ये नमुद केलेली विद्यार्थी संख्या एकसारखी असणे आवश्यक आहे. दोन्ही मध्ये तफावत असल्या संबधित कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे इ.१२ वी बोर्डाचे प्रवेश अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.
३. संच मान्यतेसोबत शैक्षणिक वर्ष **२०१३-१४,२०१४-१५,२०१५-१६,२०१६-१७** व २०१७-१८ ची संच मान्यतेची प्रत सादर करावी.
४. कनिष्ठ महाविद्यालयाचे शाखानिहाय वेळापत्रक सादर करावे.
५. विद्यार्थी निहाय/विषय निहाय शिक्षकांना दिलेला कार्यभाराचा तक्ता शिक्षकांच्या नावांनिशी व प्रकारानिशी सादर करावा. (परिशिष्ट-अ). (सोबत विहित नमुना जोडलेला आहे).
६. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रस्तावित पदे होत असल्यास त्याची नोंद संच मान्यता प्रपत्रात करावी, त्याचप्रमाणे त्याचा प्रस्ताव शिबीरातच स्वतंत्र सादर करावा.
७. माध्यमिक विभागाकडील कार्यभार देऊन उच्च माध्यमिक कडील पदे पुर्णवेळ करु नयेत, त्याचप्रमाणे उच्च माध्यमिक विभागाकडील कार्यभार माध्यमिक विभागाकडे देऊ नये.
**८.** प्रस्तावा सोबत विद्यार्थी संख्या **(सरल प्रणाली २०१८-१९ च्या हार्ड कॉपीसह सादर करावी, त्याशिवाय संच मान्यता केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**
९. प्रस्तावासोबत विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड क्रमांकाची यादी नावासह सादर करावी.
१०. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ची संच मान्यता बाबत, कॉलेज निहाय डाटा व सांख्यिकी माहिती शासनास हवी असल्यामुळे प्रत्यक्ष शिबीराच्या ठिकाणी संगणकावर ऑनलाईन माहिती भरुन त्यानंतरच संच मान्यता प्रत प्रिन्ट काढावी. त्याकरिता आवश्यक ती सर्व माहिती घेऊनच उपस्थित रहावे.

११. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये संस्थेचे कार्यरत असलेले संचालक मंडळ त्यांचा कार्यकाल, व मा.धर्मादाय आयुक्त, यांचे परिशिष्ट अ ची साक्षांकित प्रत / बदल अहवाल (चेंज रिपोर्ट ) प्रत सादर करावी.

१२. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पुर्णवेळ/अर्धवेळ/प्र.घ.ता नियुक्तीबाबत कोणताही वाद/न्यायालयीन प्रकरण सुरु नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राचार्य यांनी सादर करावे.

१३. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पुर्णवेळ/ अर्धवेळ/प्र.घ.ता नियुक्तीबाबत कोणताही वाद/न्यायालयीन प्रकरण सुरु असल्यास प्रकरण नियुक्ती/नियुक्ती रद्द करणेबाबत/संचालक मंडळातील वादाबाबत आहे, याची थोडक्यात माहितीची प्रत सादर करावी

१४. संस्थेत वाद असल्यास सादर केलेल्या प्रस्तावातील सर्व माहिती ही बिनचूक / बरोबर असल्याबाबत प्राचार्य यांनी हमीपत्र सादर करावे, त्याचप्रमाणे संस्थेतील वादामुळे प्राचार्य यांनी त्यांच्या अधिकारात केलेल्या सर्व नियुक्त्यांबाबत प्राचार्य व्यक्तिशः जबाबदार असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.

१५. प्राचार्य यांनी सादर केलेल्या माहितीबाबत भविष्यात काही न्यायालयीन प्रकरण/तक्रारी उद्‌भवल्यास त्यास प्राचार्य व्यक्तिशः जबाबदार असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

**१६.** शिबीराच्या ठिकाणी ऑनलाईन पध्दतीने तयार केलेली संच मान्यता प्रत तपासल्यानंतरच अंतिम प्रती ०४ काढण्याबाबत आदेशित केले जाईल**. (पटपडताळणी व संच मान्यतेसाठी ०४ ऑक्टोबर २०१८ ची विद्यार्थी संख्या ग्राहय धरावी)**

१७. शिबीराच्या ठिकाणीच ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये तक्ता अ,ब,क भरावयाचा असल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१७-१८ मध्ये तक्ता अ,ब,क मध्ये मान्यता दिलेल्या प्रपत्राप्रमाणे प्राथमिक माहिती तयार करुन उपस्थित रहावे.

१८. संच मान्यतेस येताना प्राचार्य, लिपीक/ संगणकीय ज्ञान असलेला कर्मचारी यांनी उपस्थित रहावे. अनावश्यक व्यक्ति किंवा कर्मचारी शिबीर ठिकाणी आणू नये.

१९. ज्या वरिष्ठ महाविद्यालय/माध्यमिक सलग्न कनिष्ठ महाविद्यालयात शिबीराचे आयोजन केलेले आहे, सदर महाविद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय आपणांस विविध सोई उपलब्ध करुन देतात, त्याचा योग्य आणि जबाबदारीने वापर करण्याची जबाबदारी (स्टेशनरी, संगणक, प्रिन्टर, इ.) प्राचार्य/लिपीक यांची राहील.

२०. सोबत जोडलेल्या तपासणी सूची प्रमाणे संच मान्यता प्रस्ताव सादर करावा.

**२१. संबधित कनिष्ठ महाविद्यालयाने संच मान्यतेच्या प्रतींची हार्ड कॉपी काढण्यासाठी ए-४ कागदाची व्यवस्था स्वतः करावी. ज्या कनिष्ठ महाविद्यालयात संच मान्यता शिबीर आहे, त्यांचेकडे ए-४ कागदांची मागणी करु नये.**

---

**१) तक्ता अ,ब,क विहित नमुन्यात तयार करुन सादर करावी.**

**अ) तक्ता अ**

१. तक्ता अ मधील कायम शिक्षक मान्यतेसाठी संबधित कनिष्ठ महाविद्यालयाने २०१३-१४ व २०१७-१८ चा तक्ता अ सादर करावा.

२. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत तक्ता अ,ब,क मंजुर करुन दिलेला नसल्यामुळे सदर शैक्षणिक वर्षातील तक्ते स्वाक्षरीसाठी सादर करु नयेत.

३. तक्ता अ मधील कायम शिक्षकांची बदली झाली असल्यास प्रस्तावासोबत बदली आदेश, कार्यमुक्ती प्रमाणपत्र, रुजु झालेल्या शिक्षकाची पुर्वीच्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक मान्यता प्रत, रुजु अहवाल सादर करावा.

४. ज्या शिक्षण सेवकांचा कालावधी पुर्ण झालेला आहे व अशा शिक्षकांना पुर्णवेळ शिक्षक वेतनश्रेणीत मान्यता दिलेली आहे. अशा शिक्षकांचा समावेश तक्ता अ मध्ये कायम शिक्षक म्हणून करावा.

**५.** ज्या शिक्षण सेवकांचा शिक्षण सेवक कालावधी संपलेला आहे, तथापि, त्यांना अद्याप पुर्णवेळ शिक्षक वेतनश्रेणीत मान्यता मिळालेली नसल्यास त्यांचा प्रस्ताव सादर करु नये. **(त्यांची नोंद तक्ता ब मध्ये करावी).**

**ब) तक्ता ब**

१. तक्ता ब मध्ये ज्या शिक्षण सेवकांना मान्यता मिळालेली आहे अशा शिक्षकांची नोंद तक्ता ब मध्ये करावी.

२. ज्यांचा शिक्षण सेवक कालावधी पुर्ण झालेला आहे, परंतु त्यांना अद्याप पुर्णवेळ शिक्षक वेतनश्रेणीत मान्यता मिळालेली नाही अशा शिक्षण सेवकांची नोंद तक्ता-ब मध्ये करावी.

३. तक्ता ब मध्ये नमुद केलेल्या शिक्षण सेवकाची या कार्यालयाने दिलेली पुर्णवेळ शिक्षण सेवक मान्यता प्रत प्रस्तावा सोबत सादर करावी.

**क) तक्ता क ( अर्धवेळ शिक्षण सेवक/शिक्षक /प्रती घडयाळी तासिका शिक्षक) यांची नोंद करावी.**

१) ज्या अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवक / प्रती घडयाळी तासिका (प्रघता) यांना फेर नियुक्ती संस्थेने दिलेली असल्यास प्रस्तावासोबत

अ) संस्था/शाळा समिती ठराव

ब) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवक / प्रती घडयाळी तासिका (प्रघता) नेमणूक आदेश / रुजु अहवाल .

क) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ किंवा २०१७-१८ ची वैयक्तिक शिक्षक मान्यता प्रत

**२) अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवक / प्रती घडयाळी तासिका (प्रघता)यांना नवीन नियुक्ती शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता दिलेली असल्यास प्रस्तावासोबत**

अ) संस्था/शाळा समिती ठराव ची प्रत

ब) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवक / प्रती घडयाळी तासिका (प्र.घ.ता) नेमणूक आदेश / रुजु अहवाल

क) शैक्षणिक अर्हता प्रती (पदवी, पदवीव्युत्तर पदवी, व्यावसायिक पात्रता (बीएड) प्रत

ऑफलाईन संचमान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतांना खालील रंगामध्ये फाईल्स सादर कराव्यात.

**पुणे- हिरवा, अहमदनगर-लाल, सोलापूर-पिवळा**

**संच मान्यता शिबीर २०१८-१९**

**नियोजित कार्यक्रम**

| अ. क्र. | दिनांक | जिल्हयाचे नांव | तालुक्याचे नांव | शिबीराचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २३.१०.२०१८ | अहमदनगर | राहता, नेवासा | प. विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालय, प्रवरानगर ता.राहाता |
| २ | २४.१०.२०१८ | | श्रीरामपूर,कोपरगांव | |
| ३ | २५.१०.२०१८ | | संगमनेर, अकोले | |
| ४ | २६.१०.२०१८ | | राखीव | |
| ---------- | | | | |
| ५ | ३०.१०.२०१८ | सोलापूर | अक्कलकोट, माढा | दयानंद महाविद्यालय, सोलापूर |
| ६ | ३१.१०.२०१८ | | मोहोळ, सोलापूर(द) | |
| ७ | ०१.११.२०१८ | | बार्शी, सोलापूर(उ) | |
| ८ | ०२.११.२०१८ | | सोलापूर शहर | |
| ९ | ०३.११.२०१८ | | राखीव | |
| ---------- | | | | |
| १० | १३.११.२०१८ | अहमदनगर | शेवगांव, पाथर्डी | पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर |
| ११ | १४.११.२०१८ | | कर्जत, जामखेड | |
| १२ | १५.११.२०१८ | | श्रीगोंदा, पारनेर | |
| १३ | १६.११.२०१८ | | अहमदनगर(शहर), राहुरी | |
| १४ | १७.११.२०१८ | | राखीव | |
| ---------- | | | | |
| १५ | २७.११.२०१८ | सोलापूर | सांगोला, पंढरपूर | शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज, ता.माळशिरस जि.सोलापूर |
| १६ | २८.११.२०१८ | | मंगळवेढा,माळशिरस | |
| १७ | २९.११.२०१८ | | राखीव | |
| ---------- | | | | |

| अ. क्र. | दिनांक | जिल्हयाचे नांव | तालुक्याचे नांव | शिबीराचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १८ | ३०.११.२०१८ | पुणे | बारामती, दौंड | विद्याप्रतिष्ठान चे कनिष्ठ महाविद्यालय, बारामती |
| १९ | ०१.१२.२०१८ | | इंदापूर, करमाळा | |
| २० | १९.११.२०१८ | पुणे | भोर, पुणे शहर (झोन-कर्वे नगर, कोथरुड, पाषाण) | मराठवाडा महाविद्यालय, डेक्कन, पुणे. |
| २१ | २०.११.२०१८ | | वेल्हा, पुणे शहर (झोन-शिवाजीनगर, औंध) | |
| २२ | ०३.१२.२०१८ | पुणे | जुन्नर | छ. शिवाजी महाविद्यालय, जुन्नर |
| २३ | ०४.१२.२०१८ | | खेड, आंबेगाव | |
| २४ | ०५.१२.२०१८ | | शिरुर | |
| २५ | ०६.१२.२०१८ | पुणे | राखीव | |
| २६ | ०७.१२.२०१८ | पुणे | सासवड | आबेदा इनामदार क.म.वि. कॅम्प, पुणे. |
| २७ | १०.१२.२०१८ | | पुणे शहर (झोन कॅम्प, येरवडा) | |
| २८ | ११.१२.२०१८ | पुणे | पुणे शहर (झोन हडपसर, धनकवडी) | |
| २९ | १२.१२.२०१८ | | पुणे शहर (झोन पर्वती, सिंहगड, स्वारगेट) | |
| ३० | १३.१२.२०१८ | | हवेली, मुळशी | |
| ३१ | १४.१२.२०१८ | | मावळ, पिंपरी चिंचवड | |
| ३२ | १५.१२.२०१८ | | उर्वरित पुणे शहर राखीव | |

सुचनाः-१) दुपारी ३.०० वाजलेनंतर कोणताही प्रस्ताव आवक केला जाणार नाही याची संबधित प्राचार्य यांनी नोंद घेवुन शिबीराच्या ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे.

२) संच मान्यता शिबीर २०१८-१९ या कालावधीत संच मान्यतेसाठी दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रस्ताव सादर न करणा-या कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता शिबीर कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत केली जाणार नाही, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित प्राचार्य यांची राहील याची नोंद घ्यावी.

३) विना अनुदान/कायम विना अनुदानित /स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयांनी कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सर्व पुर्णवेळ /अर्धवेळ/प्र.घ.ता यादी त्यांच्या नावानुसार /विषयानुसार /भ्रमणध्वनी/ई-मेल आयडीसह स्वतंत्र यादी दोन प्रतीत सादर करावी.

ज्या वरिष्ठ महाविद्यालय/माध्यमिक सलग्न कनिष्ठ महाविद्यालयात शिबीराचे आयोजन केलेले आहे, सदर महाविद्यालय/कनिष्ठ महाविद्यालयातील नियम/शिस्त पाळण्याची /अबाधित ठेवण्याची जबाबदारी शिबीरास उपस्थित सर्व प्राचार्य/लिपीक यांची राहील याची नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-

**(मिनाक्षी राऊत)**
**प्र.शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग पुणे-१**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

**१.** मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१

२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे-१

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-** शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे/अहमदनगर/सोलापूर यांनी शिबीर पार पाडण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी.

**सदर तपासणी सुची प्रमाणे कागदपत्रे लावल्यानंतरच नस्ती तपासली जाईल याची नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | विषय | पानक्रमांक |
|---|---|---|
| | संच मान्यता फाईल सादर केलेल्या संचिकेत प्रत्येक पानाला पान क्रमांक नोंदवावे (उदा-१,२,३, इ.) | |
| १ | प्राचार्य यांचे पत्र | |
| २ | सांख्यिकी माहिती तक्ता | |
| ३ | विद्यार्थी निहाय/विषय निहाय/शाखा निहाय शिक्षकांना दिलेला कार्यभाराचा तक्ता शिक्षकांच्या नावांनिशी व प्रकारानिशी (पुर्णवेळ/अर्धवेळ/प्रघता) सादर करावा. (परिशिष्ट-अ). | |
| ४ | कनिष्ठ महाविद्यालयाचे शाखानिहाय वेळापत्रक सादर करावे. | |
| ५ | शै.वर्ष २०१३-१४ संच मान्यता प्रत व तक्ता अ,ब,क प्रती | |
| ६ | शै.वर्ष २०१४-१५,२०१५-१६,२०१६-१७ संच मान्यता प्रत | |
| ७ | शै.वर्ष २०१७-१८ संच मान्यता प्रत व तक्ता अ,ब,क प्रती | |
| ८ | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये संस्थेचे कार्यरत असलेले संचालक मंडळ त्यांचा कार्यकाल, व मा.धर्मादाय आयुक्त, यांचे परिशिष्ट अ ची साक्षांकित प्रत / बदल अहवाल (चेंज रिपोर्ट ) | |
| ९ | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये अर्धवेळ/प्र.घ.ता नियुक्तीबाबत कोणताही वाद/न्यायालयीन प्रकरण सुरु नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राचार्य यांनी सादर करावे. | |
| १० | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये अर्धवेळ/प्र.घ.ता नियुक्तीबाबत कोणताही वाद/न्यायालयीन प्रकरण सुरु असल्यास प्रकरण नियुक्ती/नियुक्ती रद्द करणेबाबत / संचालक मंडळातील वादाबाबत आहे, याची थोडक्यात माहितीची प्रत | |
| ११ | संस्थेत वाद असल्यास सादर केलेल्या प्रस्तावातील सर्व माहिती ही बिनचूक / बरोबर असल्याबाबत प्राचार्य यांनी हमीपत्र सादर करावे, त्याचप्रमाणे संस्थेतील वादामुळे प्राचार्य यांनी त्यांच्या अधिकारात केलेल्या सर्व नियुक्त्यांबाबत प्राचार्य व्यक्तिशः जबाबदार असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. | |
| १२ | प्राचार्य यांनी सादर केलेल्या माहितीबाबत भविष्यात काही न्यायालयीन प्रकरण/तक्रारी उद्‌भवल्यास त्यास प्राचार्य व्यक्तिशः जबाबदार असल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| १३ | तक्ता अ (ज्या कायम शिक्षकांची संस्थांतर्गत बदली झालेली आहे अशा शिक्षकांची बदली आदेश, कार्यमुक्ती पत्र, रुजु अहवाल, बदलुन आलेल्या कर्मचा-यांचे बदली आदेश, रुजु अहवाल, पुर्वीच्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक मान्यता आदेश | |
| १४ | तक्ता ब (शिक्षण सेवक नियुक्ती मान्यता प्रती ) | |
| १५ | तक्ता क (अर्धवेळ शिक्षण सेवक/शिक्षक) नियुक्ती बाबतचे कागदपत्रे (शिक्षकनिहाय, एका शिक्षकाची सर्व नेमणूकीसंदर्भातील सर्व कागदपत्र पुर्ण लावल्यानंतरच दुस-या शिक्षकांची कागदपत्रे लावु नयेत). | |
| १६ | तक्ता क्र (प्रती घडयाळी तासिका (प्रघता) नियुक्ती बाबतचे कागदपत्रे (शिक्षकनिहाय, एका शिक्षकाची सर्व नेमणूकीसंदर्भातील सर्व कागदपत्र पुर्ण लावल्यानंतरच दुस-या शिक्षकांची कागदपत्रे लावु नयेत). | |
| १७ | **सरल प्रणाली मध्ये भरण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीचा तक्ता** | |
| १८ | विना अनुदान/कायम विना अनुदानित /स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयांनी कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सर्व पुर्णवेळ /अर्धवेळ/प्र.घ.ता यादी त्यांच्या नावानुसार /विषयानुसार /भ्रमणध्वनी/ई-मेल आयडीसह स्वतंत्र यादी दोन प्रतीत. | |
| १९ | पुणे मनपा क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे ॲलोकेशन झालेल्या विद्यार्थ्यांची यादीची प्रत | |
| २० | विज्ञान शाखेसाठी बायोमॅट्रीक खरेदी पावती, मशिन बसविल्याचा फोटो, ०४ ऑक्टोबर रोजीची बायोमॅट्रीक उपस्थिती प्रिन्ट इ. | |